**प्रतिवातर्फे साक्षीदार क्रं.१ यांचा पुढील सरतपास प्रतिवादीचे वकिल श्री एस.जी. कुळकर्णी यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

०७. मी या प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे.

सरतपास संपला.

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री डी.एम. कुटे यांचे मार्फत सुरू.**

०८. दिनांक २७.०५.२०१५ रोजीचा जो विक्रीचा करारनामा हा वादी व माझे दरम्यान झाल्याचे मी कथन करीत आहे तो करारनामा माझे ताब्यात नाही तो वादीच्या ताब्यात आहे. आता मला निशाणी क्रं.४३ हा करारनामा दाखविण्यात आला तो हाच करारनामा आहे. माझे व वादीचे दरम्यान खरेदी—विक्रीचा जो करारनामा ठरला होता त्यानुसार मी ३,७६,०००/— या मोबद्ल्यात वादीचे वाहन खरेदी करण्याचे ठरले होते व त्यापैकी मी वादीला २६,०००/— रूपये ही इसाराची रक्कम दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, करारनाम्यानुसार चोलामंडलम फायनान्सच्या दरमहा १०,०००/— रूपये एकूण ३५ किस्त मला भरायच्या होत्या परंतु मी त्या पैकी एकही किस्त भरलेली नाही. दिनांक १३.०९.२०१५ रोजी वादी हा माझेकडे असे म्हणायला आलेला नाही की, मी एकही किस्त भरलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी त्याला म्हणालो की, मी सदर ॲटो हे वाहन श्री गोलु भिकु अजनेरीया यांना विकले आहे. मी गोलु भिकु अजनेरीया यांचेकडून मिळालेल्या मोबद्ल्यातील कोणतीही रक्कम वादीला दिलेली नाही किंवा चोलामंडलम फायनान्सला भरलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीने माझे विरूध्द पोलीस ठाण्यात फसवणुकीचा रिपोर्ट दिला होता. पोलीसांनी मला चौकशीसाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या पुढे असे कबुल केले होते की, मी ज्या कालावधीसाठी ॲटो वापरला त्या कालावधीचे फायनान्स चे पैसे भरेल व वादीचा ॲटो वादीला परत देईल.

प्रश्नः— तुम्ही वादीला ॲटो परत दिलेला नाही हे म्हणणे खरे आहे काय ?
उत्तरः— मी त्याला ॲटो परत घे, असे म्हटले परंतु त्याने तो घेतला नाही.

०९. आज घडीला सदर ॲटो कुठे आहे हे मला माहीत नाही. मी तो ॲटो विकला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वडीलांचे शेत सदर ॲटो वरील कर्जाकरीता चोलामंडलम फायनान्स कंपनीने जप्त केले होते. हे मला माहीत नाही की, सदर ॲटोचे संपुर्ण कर्ज वादीने चोलामंडलम फायनान्स कंपनीला परतफेड केले आहे. आता मला निशाणी क्रं.४७ हा नोटीसीचा परत आलेला लिफाफा दाखविण्यात आला त्यावर नमुद असलेला माझा पत्ता हा बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर ॲटोवरील कर्जाची रूपये ३,५०,०००/— ही रक्कम वादीने व्याजासह फेडल्यामुळे मी सदर रक्कम त्यावरील व्याजासह वादीला परत देणे लागतो व ती देण्याची माझी जबाबदारी आहे. चोलामंडलम फायनान्स कंपनीचा सदर कर्जावरील व्याजाचा दर हा १८ टक्के प्रतिवर्ष असल्याचे मला माहीत नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दिनांक ०६.०१.२०२६.

( महेश एस. काळे )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अकोट.